**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, JULY-AUG 2017, VOL- 4/35*

# जिल्हा परिषद अर्थसंकल्प : शिक्षणविषयक तरतूदींबाबत शिक्षकांच्या अपेक्षा

**दिगंबर दुर्गाडे, Ph. D.**

*सहयोगी प्राध्यापक, टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे*

**Abstract**

*जिल्हा परिषद ही ग्रामीण भागामध्ये शिक्षण देणारी महत्वाची अशी स्थानिक संस्था आहे. तर पुणे जिल्हा परिषद ही देशातील आर्थिकदृष्टया सक्षम अशी जिल्हा परिषद असूनही अर्थसंकल्पामधील शिक्षणविषयक तरतूदींबाबत परिपूर्ण माहिती असताना शिक्षकांची संख्या फक्त १० टक्के असून अल्प, अत्यल्प आणि अजिबात माहिती नसणाऱ्यांची संख्या ९० टक्के आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षक व केंद्र प्रमुखांच्या मते अर्थसंकल्पामध्ये शिक्षणविषयक तरतूदी करताना भौतिक सुविधा, मानवी संसाधन, अध्ययन अध्यापन सुविधा, संशोधन आणि विकास इत्यादी शीर्षाचा विचार करावा. तसेच अर्थसंकल्प तयार करताना शिक्षक, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, विस्तार अधिकारी, गटशिक्षण अधिकारी, ग्रामशिक्षण समिती, फलक व तज्ञांचा सहभाग घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली. जिल्हा परिषदेच्या शिक्षण प्रक्रियेतील सर्वच महत्वांच्या घटकांच्या सूचना व अपेक्षांचा विचार केल्यास अर्थसंकल्प सर्वसमावेशक व अपेक्षित उद्‌दिष्टे साध्य करणारा होईल.*

***महत्वाचे मुद्‌दे :*** *जिल्हा परिषद अर्थसंकल्प, शिक्षणविषयक तरतूदी, शिक्षकांच्या अपेक्षा*

***Scholarly Research Journal's* is licensed Based on a work at *www.srjis.com***

## १. प्रस्तावना :

जिल्हा परिषद ही ग्रामीण भागामध्ये शिक्षण देणारी महत्वाची अशी स्थानिक संस्था आहे. तर पुणे जिल्हा परिषद ही देशातील आर्थिकदृष्टया सक्षम अशी जिल्हा परिषद असूनही अर्थसंकल्पामधील शिक्षणविषयक तरतूदींबाबत परिपूर्ण माहिती असताना शिक्षकांची संख्या फक्त १० टक्के असून अल्प, अत्यल्प आणि अजिबात माहिती नसणाऱ्यांची संख्या ९० टक्के आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षक व केंद्र प्रमुखांच्या मते अर्थसंकल्पामध्ये शिक्षणविषयक तरतूदी करताना भौतिक सुविधा, मानवी संसाधन, अध्ययन अध्यापन सुविधा, संशोधन आणि विकास इत्यादी शीर्षाचा विचार करावा. तसेच अर्थसंकल्प तयार करताना शिक्षक, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, विस्तार अधिकारी, गटशिक्षण अधिकारी, ग्रामशिक्षण समिती, फलक व तज्ञांचा सहभाग घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली. जिल्हा परिषदेच्या शिक्षण प्रक्रियेतील सर्वच महत्वांच्या घटकांच्या सूचना व अपेक्षांचा विचार केल्यास अर्थसंकल्प सर्वसमावेशक व अपेक्षित उद्‌दिष्टे साध्य करणारा होईल.

## २. अर्थसंकल्पाबाबत शिक्षकांना असणारी माहिती:

शाळातील शिक्षक व केंद्र प्रमुखांना जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पातील शिक्षण विषयक तरतूदींबाबत असणारी माहिती संशोधकाने जाणून घेतली. शिक्षक व केंद्र प्रमुखांना अर्थसंकल्पातील शिक्षण विषयक तरतूदींबाबत माहिती अल्प प्रमाणात आहे.

### २.१ अर्थसंकल्पाविषयक माहितीचे स्त्रोत :

जिल्हा परिषदेच्या शिक्षक आणि केंद्र प्रमुख यांनी प्रश्नावलीला दिलेल्या प्रतिसादानुसार असे लक्षात येते की, ज्या प्रतिसादकांना जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्प विषयक माहिती मिळाली ती माहिती जिल्हा परिषदेची वेबसाईट, शिक्षण विभाग, शिबिरे, सभा, वरिष्ठ अधिकारी या स्त्रोतांकडून मिळाली.

**२.२ अर्थसंकल्पातील शिक्षण विषयक माहिती उपलब्ध करून देणाऱ्या माध्यमाविषयी शिक्षकांच्या अपेक्षा:**

शिक्षक आणि केंद्र प्रमुखांना अर्थसंकल्पातील शिक्षण विषयक माहिती उपलब्ध करून देण्याची माध्यमे ई मेल, अर्थसंकल्पाची छापील प्रत, प्रशासक वर्तमानपत्रे, सभा, कार्यशाळा, उद्बोधन वर्ग इत्यादी माध्यमे असावीत अशी अपेक्षा आहे. अर्थसंकल्पाची माहिती वरिल साधनांव्दारे मिळावी असे शिक्षकांना वाटते.

**२.३ अर्थसंकल्पातील शिक्षण विषयक तरतूदी समजून घेण्यासाठी अपेक्षित मार्गदर्शन:**

शिक्षकांना अर्थसंकल्पातील शिक्षणविषयक तरतूदी समजून घेण्यासाठी कार्यशाळा, उद्बोधन वर्ग, केंद्र संमेलन, गटसंमेलन इत्यादीव्दारे मार्गदर्शन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केल्याचे आढळते. अर्थसंकल्पातील शिक्षण विषयक तरतूदींची परिणामकारक अंमलबजावणी करावयाची असेल तर अर्थसंकल्प व विविध तरतूदी लाभार्थींना सखोलपणे समजणे आवश्यक आहे.

**२.४ अर्थसंकल्पात शिक्षणविषयक तरतूदींबाबत अपेक्षित शीर्ष :**

जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या मते अर्थसंकल्पामध्ये शिक्षणविषयक तरतूदी करीत असताना भौतिक सुविधा, मानवी संसाधन, अध्ययन अध्यापन सुविधा, संशोधन आणि विकास, तसेच या प्रत्येक शीर्षासाठी अर्थसंकल्पामध्ये विशिष्ट रकमेची तरतूद करावी आणि सदर तरतूदीची संपूर्ण रक्कम त्याच वर्षी प्रत्यक्षात खर्च होईल याची दक्षता घ्यावी. या चार मुख्य शीर्षाअंतर्गत इतर सर्व उपशीर्षांचा समावेश केला जावा.

**२.५ जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प तयार करताना शिक्षक प्रतिनिधींचा सहभाग:**

जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प तयार करताना शिक्षक प्रतिनिधींबरोबर अर्थसंकल्प तयार करण्यापूर्वी खुली चर्चा करावी. ही चर्चा केंद्रपातळीवर किंवा तालुकापातळीवर केली जावी. तसेच वेबसाईटव्दारे मते व सूचना मागवाव्यात आणि सर्वेक्षण करून त्याचाही आधार अर्थसंकल्प तयार करताना घ्यावा.

**३. अर्थसंकल्प तयार करताना शिक्षण विषयक विचारात घ्यावयाचे मुद्दे:**

जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प तयार करताना शाळांची गुणवत्ता वाढविणे व टिकविणे यासाठी शाळांमध्ये उपलब्ध भौतिक सुविधा व मानवी संसाधन, शाळांच्या गरजा, इतर शाळांशी स्पर्धा करण्याची क्षमता, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या अध्ययन व अध्यापन विषयक गरजा या प्रमुख मुद्दयांचा विचार व्हावा असे प्रतिसादकांनी मत नोंदविले आहे.

**३.१ अर्थसंकल्प तयार करताना शिक्षणविषयक तरतूदींसाठी सहभागी घटक:**

शैक्षणिक अर्थसंकल्प तयार करताना शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख यांचा प्रामुख्याने व प्राधान्याने सहभाग असावा असे मत अनेकांनी प्रश्नावलीव्दारे व्यक्त केले आहे.

म्हणजेच शिक्षक, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, विस्तारअधिकारी, गटशिक्षणाधिकारी, ग्रामशिक्षण समिती व पालक या घटकांचा सहभाग असावा अशी अपेक्षा प्रतिसादकांनी व्यक्त केली आहे. ज्यांच्यासाठी व ज्यांच्याकडून औपचारिक शिक्षणाची अंमलबजावणी केली जाते, त्यांची मते, अपेक्षा, कल्पना व अनुभवांचा विचार शिक्षण विषयक तरतूदी ठरविताना अर्थसंकल्पात करण्यात यावा, ज्यामुळे अर्थसंकल्प पारदर्शक, वास्तव व उपयुक्त होईल.

**३.४ अर्थसंकल्पामध्ये कोणत्या भौतिक सुविधांसाठी विशेष तरतूदी:**

शिक्षण विषयक अर्थसंकल्पामध्ये शालेय इमारत, शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्युत व्यवस्था, शौचालय व संरक्षक भिंत या पाच प्रमुख मुद्दयांचा भौतिक सुविधेच्या दृष्टीने विचार करणे महत्वाचे आहे. म्हणजेच आजही जिल्हा परिषदेच्या शाळांना या पाच महत्वाच्या भौतिक सुविधांचे प्रश्न भेडसावत असल्याचे लक्षात येते.

३.५ **अर्थसंकल्पामध्ये शैक्षणिक साधनांची तरतूद :**

अर्थसंकल्पामध्ये शैक्षणिक तरतूदी करीत असताना शैक्षणिक साधनांमध्ये तंत्रज्ञानविषयक सोयी सुविधा, आधुनिक शैक्षणिक साधने व पारंपारिक शैक्षणिक साधनांसाठी मुख्यत्वे तरतूद करावी असे शिक्षक व केंद्रप्रमुखांनी मत व्यक्त केले आहे. सर्वाधिक मागणी ही तंत्रज्ञानविषयक सोयी सुविधा निर्मितीसाठी केली असल्याचे आढळते.

**३.६ वर्गखोल्या व्यतिरिक्त इतर सुविधांसाठी भरीव तरतूद :**

अर्थसंकल्पामध्ये वर्ग खोल्यांव्यतिरिक्त प्राधान्याने संगणक प्रयोगशाळा, क्रिंडागण, ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा, गणित प्रयोगशाळा, भाषा प्रयोगशाळा, कलादालन, समाजशास्त्र प्रयोगशाळा यासाठी तरतूद केली जावी. विशेषत: संगणक प्रयोगशाळा, क्रिंडागण, ग्रंथालय व विज्ञान प्रयोगशाळा जास्त महत्वाची असल्याने त्यासाठी विशेष तरतूद असावी.

**४. मानवी संसाधनासाठी तरतूद :**

शिक्षणविषयक तरतूदी करीत असताना नियमित शिक्षकांव्यतिरिक्त संगणक शिक्षक, स्वतंत्र इंग्रजी शिक्षक, स्वतंत्र गणित व विज्ञान शिक्षक, कला, नृत्य, व नाटय शिक्षक, क्रिडा शिक्षक याबरोबरच एक लिपिक व एक शिपाई या मानवी संसाधनांसाठी अर्थसंकल्पात तरतूद असावी याचा गांभीर्याने विचार व्हावा. शिक्षण विषयक अर्थसंकल्प तयार करताना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सदर अपेक्षांचा समावेश प्राधान्याने करणे गरजेचे वाटते.

**४.१ शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी उपलब्ध निधीचे प्रमाण:**

जिल्हा परिषदेच्या शाळातील शिक्षकांना जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पातील शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी उपलब्ध निधीचे प्रमाण अल्प व अपुरी आहे. परिणामकारक व दर्जेदार सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी पुरेशा निधीची तरतूद अर्थसंकल्पामध्ये व्हावी ही शिक्षकांची अपेक्षा आहे.

**४.२ शिक्षकांकरिता प्रोत्साहनपर योजनांसाठी निधी :**

शिक्षकांना प्रोत्साहन मिळावे तसेच त्यांची व्यावसायिक कार्यक्षमता व गुणवत्ता वाढावी यासाठी त्यांच्या अभ्यासभेटी व अभ्यास दौऱ्याचे आयोजन करावे, त्यांचा कृतीसंशोधनामध्ये सहभाग वाढवावा, नवोपक्रम स्पर्धांमध्ये त्यांनी भाग घ्यावा, शैक्षणिक परिषदांमध्ये सहभाग घेवून ज्ञानाचे, विचारांचे, अनुभवांचे आदान प्रदान करावे याबरोबरच उत्तम काम करणाऱ्या आदर्श शिक्षकांचा गुणगौरव समारंभाचे आयोजन करावे. वरील बाबींमुळे शिक्षकांना प्रोत्साहन मिळेल तसेच शिक्षकांना कराटे प्रशिक्षण मिळावे अशी अपेक्षा आहे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**४.३ विद्यार्थ्यांसाठी अर्थसंकल्पात प्रोत्साहनपर योजनांकरिता तरतूद :**

जिल्हा परिषदेच्या शाळातील शिक्षकांना जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहनपर योजनांकरिता निधीची तरतूद केल्यास, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळून त्यांचा शैक्षणिक गुणवत्तेवर सकारात्मक परिणाम होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून वरील बाबींसाठी अर्थसंकल्पात तरतूद होणे गरजेचे आहे.

**४.४ शिक्षणविषयक तरतूदींसह सर्व समावेशक अर्थसंकल्प निधीसाठी सूचना:**

**भौतिक सुविधांबाबत सूचना:** शाळागृह खोल्या व दुरूस्ती, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वीजपुरवठा, वीजबीलासाठी स्वतंत्र तरतूद, क्रिडासाहित्य, मैदान, संरक्षक भिंती, शौचालये, शौचालय स्वच्छता, सेंट्रल किचन निर्मिती, शिक्षक निवासस्थान, प्रयोगशाळा, सौर अभ्यासिका इ.

**मानवी संसाधनांबाबत सूचना:** सर्व विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, स्पर्धा परिक्षांची तयारी, प्रोत्साहनपर विद्यार्थी निधी, बाळंतपण रजेच्या कालावधीत तात्पुरत्या शिक्षकाची नेमणूक, सायकल पुरवठा, विविध खेळांसाठी तरतूद इ.

**अध्ययन अध्यापनाबाबत सूचना:** डिजिटल शाळा, ई लर्निंग, ग्रंथालये, तंत्रस्नेही शिक्षक, इंग्रजी संभाषण वर्ग, कला, कार्यानुभव, संगित व शारीरिक शिक्षणावर भर, मोफत संगणक व इंटरनेट सुविधा, इंग्रजीचे प्रशिक्षण, शैक्षणिक साहित्य, प्रत्येक शिक्षक व विद्यार्थ्याला टॅब पुरविणे इ.

**४.४ जिल्हा परिषद शाळांच्या गरजा आणि अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष तरतूदी या विषयी शिक्षकांचे मत:**

जिल्हा परिषद शाळेच्या गरजा आणि अर्थसंकल्पात केलेल्या तरतूदी यांची तुलना केली असता, शाळांच्या गरजांसाठी केलेल्या तरतूदी कमी आहेत तसेच काही गरजांची दखल अर्थसंकल्पात घेतलेली नाही. त्याचप्रमाणे शाळांच्या गरजा व अर्थसंकल्पातील तरतूदी यात काही ठिकाणी समन्वय आढळत नाही. तसेच या शिक्षकांच्या मते जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पामध्ये शाळांच्या गरजांचे प्रतिबिंब अल्प प्रमाणात पहावयास मिळते.

**४.५ शाळांच्या गुणवत्ता वाढीकरिता आयएसओ नामांकनासाठी जिल्हा परिषद अर्थसंकल्पात निधीची उपलब्धतता:**

शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी आय.एस.ओ नामांकनासाठी जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात सर्वच शाळांना निधी उपलब्ध करून द्यावा. आय.एस.ओ. नामांकन निधी म्हणून स्वतंत्र शीर्ष जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात असावे. आय.एस. ओ नामांकनापेक्षा शाळांच्या परिपूर्ण गुणवत्तेवर भर द्यावा.

**४.६ प्रत्येक शाळेला डिजीटल शाळा बनविण्यासाठी अर्थसंकल्पात निधी उपलब्धता :**

जिल्हा परिषदेची प्रत्येक शाळेचे डिजीटल शाळेत रूपांतर करण्यासाठी अर्थसंकल्पात निधी उपलब्ध करून द्यावा, त्यासाठी स्वतंत्र डिजीटल शाळा रूपांतर निधी म्हणून स्वतंत्र शीर्ष जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात असावे.

**५. शाळांच्या गरजा व प्रत्यक्ष तरतूदी :**

जिल्हा परिषद शाळांना स्पर्धेत खाजगी शाळा व इंग्रजी शाळांबरोबर स्पर्धेत टिकून राहण्यासाठी अर्थसंकल्पात विविध योजनांचा समावेश करणे आवश्यक आहे. तसेच या नवीन योजनांसाठी जिल्हा परिषदेने अर्थसंकल्पात खालील भरीव निधीची तरतूद करावी.

**१. भौतिक सुविधांबाबत योजना :**

जिल्हा परिषद शाळांचे डिजिटल शाळांमध्ये रूपांतरण, सुसज्ज इमारत, भव्य क्रिडांगणे, सुसज्ज ग्रंथालय, वाचन कक्ष, संगणक प्रयोगशाळा, भाषा व विज्ञान प्रयोगशाळा, वाहतुकीची व्यवस्था, सेंट्रल किचन, संगित व क्रीडा साहित्य, सोलर व विद्युत व्यवस्था, स्वतंत्र अभ्यासिका इ.

**२. मानवी संसाधनाबाबत योजना :**

गुणवत्ता पूर्ण व तंत्रस्नेही शिक्षकांची नेमणूक,

शिक्षकांना दर्जेदार सेवांतर्गत प्रशिक्षण

प्रत्येक शाळेसाठी पुरेसा कर्मचारी वर्ग (इंग्रजी, गणित, विज्ञान व संगणक विषयांसाठी स्वतंत्र शिक्षक, क्लार्क, शिपाई, स्वयंपाकी इ.)

**३. अध्ययन अध्यापनाबाबत योजना :**

जिल्हा परिषद शाळांना सेमी इंग्रजी व इंग्रजी माध्यमात अध्यापनाचे स्वातंत्र्य, शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे, शालेय स्नेहसंमेलनाचे आयोजन, शाळा व्यवस्थापन समितीची निर्मिती, बालआनंद मेळावे, विज्ञान प्रदर्शने, गणित व विज्ञान काचपेटया, मोफत गणवेश, शिक्षक व विद्यार्थी गुणगौरव, रात्र अभ्यासिका व प्रभात अभ्यासिका सुरू करणे, जादा तासिका, मार्गदर्शनांच्या सोयी इ.

**जिल्हा परिषद शाळांमध्ये गुणवत्ता वाढीसाठी अर्थसंकल्पात अपेक्षित योजना**

जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये गुणवत्ता वाढीसाठी अर्थसंकल्पात डिजीटल शाळा योजना, क्रीडा प्रबोधिनी, गणित, विज्ञान व इंग्रजी ज्ञान समृध्दी योजना, संगणक कौशल्य विकास योजना, जिल्हा परिषद ऑलिंपियाड (गणित, विज्ञान, भाषा स्पर्धा परिक्षा), कला प्रबोधिनी (नाटय, नृत्य, चित्रकला), शिक्षक बांधिलकी विकास योजना, साधन शाळा योजना, शालेय संशोधन व विकास, शिक्षकांसाठी नवोपक्रम उद्बोधन योजना, शालेय संशोधन व विकास योजना, तंत्रस्नेही शिक्षक विकास योजना, शालेय मूल्यांकन योजना, बहुविध बुध्दीमत्ता शोध योजना, विद्यार्थी आदान प्रदान योजना (Student Exchange Program), शिक्षक आदान प्रदान योजना (Teacher Exchange Program), शिक्षक गुणवत्ता सुधारमंच, विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी योजना, शैक्षणिक ॲप निर्मिती व उपयोग योजना, शिक्षकांसाठी आंतरक्रियात्मक मंच (Interactive platform), निर्मिती योजना, या योजनांव्दारे शाळेची गुणवत्ता वाढेल, शिक्षकांना प्रोत्साहन मिळेल, त्यांची व्यावसायिक कार्यक्षमता व गुणवत्ता वाढेल आणि जिल्हा परिषद शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या शिक्षणाकडे समाज चांगल्या दृष्टिकोनाने पाहिल, तसेच खाजगी व इंग्रजी शाळांकडे विद्यार्थ्यांचा वाढणारा कल कमी होवून जास्तीत जास्त विद्यार्थी जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेशित होतील व दर्जेदार शिक्षण घेतील.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**संदर्भसूची**

*ओझरकर, सु. रा. (२०११), राजस्व, नागपूर, विदया प्रकाशन.*
*भिंताडे, वि. रा., (२००९), शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे, नित्य नूतन प्रकाशन.*
*सांळुके धैर्यशिल (२००८), महाराष्ट्राचा अर्थसंकल्प : एक दृष्टिक्षेप, औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन्स.*
*गोविलकर, वि. म. (२००५), भारताचा अर्थसंकल्प अर्थ आणि अन्वयार्थ, मुंबई, ग्रंथाली प्रकाशन.*
*चाफेकर, वि. आणि भरगुडे, अ. (१९८९), पंचायत राज व स्वयंसेवी संस्था : पुणे, विपुल प्रकाशन.*
*कायंदे—पाटील, गंगाधर (२००८), संशोधन पध्दती, नाशिक, चैतन्य प्रकाशन.*
*भावे, ह. अ., (२०१२), कौटिलीय अर्थशास्त्र, मराठी भाषांतर, पुणे, वरदा प्रकाशन.*
*चव्हाण, दि. आणि मुळे, सं. (२०१३), शैक्षणिक संशोधन आराखडा, नाशिक, इनसाईट प्रब्लिकेशन्स.*
*पाटील, वा. भा, (२०१२), संशोधन पध्दती, जळगाव, प्रशांत पब्लिकेशन्स.*
*ब्रम्हे, सुलभा (२०१०), अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ, पुणे, गंधर्व वेदप्रकाशन.*
*वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०११—१२), अर्थसंकल्प, जिल्हा परिषद निधी, सन २०११—१२ चा सुधारित व सन २०११—१२ चा मूळ अर्थसंकल्प, पुणे, जिल्हा परिषद.*
*वित्त विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे (२०१५—१६), प्रदाने लेखाशीर्ष, जिल्हा परिषद निधी, सन २०१५—१६ चा खर्च, पुणे, जिल्हा परिषद.*
*पाटील, लीला आणि कुलकर्णी, विश्वंभर, (१९९०), आजचे शिक्षण आजच्या समस्या, (४ थी आवृत्ती), पुणे, सुविचार प्रकाशन.*
*पंडित, बन्सी बिहारी, (२००८), शिक्षणातील संशोधन, पुणे, नित्य नूतन प्रकाशन.*
*महाराष्ट्र राज्य, शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे (१९९२), राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, १९८६ : शैक्षणिक आव्हानांकडून कृती कार्यक्रमाकडे, पुणे.*